**Historicity Research Journal**
**ISSN : 2393-8900**
**Impact Factor : 0.4521 (UIF)**
**Volume - 2 | Issue - 11 | July - 2016**

# *शिक्षण सम्राट ना. जगन्नाथ शंकरसेट उर्फ नाना शंकरसेट*

*प्रा. जगदिश दयासागर हेंडवे*
*इतिहास विभाग प्रमुख , बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय,*
*पारवा ता. घाटंजी जि. यवतमाळ.*



### *प्रस्तावना*

हजारो कोसावर ब्रिटीश लोक व्यापार धंद्यानिमित्त भारतात आले. व भारतीय लोकांच्या अज्ञानाचा व आपसातील दुहीचा वाटेल तसा फायदा घेवून त्यांनी या देशाचे राज्य बळकावले. जनतेत शहाणपणा असता तर स्वातंत्र्य गमावून पारतंत्र्यात खितपड पडण्याचे दुर्दैव या देशाच्या वाटयासं आले नसते.जनतेत सर्वत्र पसरलेल्या मुर्खपणाच्या समजूती, अंधःश्रध्दा, आळस, वगैरे गुण दूर करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण प्रसार हेच होय.

प्रसिध्द साधुवर्य व महान संत कबीर असे म्हणतात 'नर करनी करे तो नरका नारायण होय', परंतु या म्हणीप्रमाणे मनुष्यमात्राच्या हातून करनी मात्र योग्य तऱ्हेने झाली पाहीजे. आता ती करनी सर्वोत्तम रीतीने पूर्ण दशेस येण्यास मुख्य साधन विद्या हेच आहे. हया साधनांच्या योगाने ज्यांनी आपला कालक्षेप योग्य रीतीने घालून आपली उर्जितावस्था करुन घेतली, इतकेच नव्हे तर, त्या साधनांचा म्हणजे विद्येचा व्यासंग अखंड केला, तीच माणसे हया जगत्कोंडावर हिऱ्याप्रमाणे चमकत असतात. मग ती कोणत्याही धर्माची अगर कोणत्याही देशातील असोत, ती सर्व ठिकाणी वंदनपात्र, प्रशसनीय, पुजार्ह असतात. बालपणासून सतत विद्याव्यासांगत निमग्न राहून, ज्ञानसंपन्न झाल्यावर त्या ज्ञानाचा सृष्टीजन्य वस्तूंशी सहचर्याने प्रत्यक्ष अनुभव घेवून, त्याचा इतर जनांस लाभ करुन देण्यात आपल्या आयुष्याच्या सदउपयोग करुन ज्यांनी कालक्षेप केला व अज्ञान गोष्टी ज्ञात करुन जगाच्या निदर्शणास आणल्या, अशा नररत्नांनी या भूतलावर विहार करुन आपल्या सत्कीर्तिपरीमलाने ही दिग्गजमंडळी पुजनिय आहे.

आजची मुले ही उदयाची भावी नागरीक असतात, हीच मुले आपल्या देशाचा उध्दार करणार, देशाचे भविष्य बनविणार, शिक्षणामुळेच आपापल्या देशाभिमानाची जाणीव होते. आजच्या मुलांना योग्य शिक्षण मिळाले तर ती मुले स्वाभिमानी निपजतील. आपल्या देशाविषयी त्यांना तळमळ वाटू लागेल, आणि मग मागच्या पिढीने अडाणीपणाने आपापसात भाडून जे राज्य गमावले ते परत घेण्याचा ती प्रयत्न करतील, असे विचार नानांच्या मनात येवून त्यांनी मुलामध्ये शिक्षण प्रसार व्हावा या करीता प्रयत्न सूरु केले. याकरीता प्रथम साक्षरता वाढविणे म्हणजे प्रत्येकास निदान लिहीता वाचता येणे आवश्यक आहे. हे साधे कार्यही त्याकाळात नव्हते. विद्या शिकविण्याचे कार्य ब्राम्हण करत आणि ते असेही म्हणत की विद्या ही पवित्र, सरस्वती देवी आहे. व तिला केवळ ब्राम्हणांनीच स्पर्श करावा. दुसऱ्या बाजूने इंग्रज सरकारला वाटे की जर लोक सुशिक्षित झाले तर आपले राज्य टिकू देणार नाहीत. कारण भारतीय लोकांच्या अडाणीपणामुळेच इंग्रजांनी राज्य मिळविले होते.

त्याकाळात आजच्या सारख्या शाळा नव्हत्या लिहिता वाचता येण्यापुरते शिक्षण घेण्यासाठी ब्राम्हण व पांढरपेशी मुले तात्या पंतोजीच्या घरीच जात. ब्राम्हणांनीच विद्या शिकावी व इतरांना तसा अधिकार नाही, असा समज प्राचीन काळापासून होता. सर्व ज्ञान संस्कृत ग्रंथात आहे. श्रीमंतांनी घरी बसून खावे, कोणत्याच प्रकारचा उद्योग करु नये, केला तर त्यांच्या खाणदाणीपणाला बट्टा लागतो. सुखी जीवनाची कल्पना, सुग्रास खावे आणि रिकामटेकडया गप्पा मारीत बसावे! शिक्षणासाठी लागणाऱ्या पुस्ताकांचाही अभाव होता. एखादया देवळात किंवा पडक्या घरात गावातील थोडी लोक जमवावयाची व पंतोजींनी त्यांना धुळाक्षराचे पाठ दयावयाचे. इंग्रज सरकारला राज्यकारभारासाठी तलाठी, कारकून, मामलेदार अशा प्रकारचे नोकर हवे होते. कारण हे काम करण्यासाठी इंग्लंडवरुन लोक आणणे शक्य नव्हते. अशा प्रकारचे नोकर तयार करण्यासाठी म्हणून सरकारने शाळा सुरु केल्या, पण अशा शाळेत मिशनरी लोक बायबलचे म्हणजे ख्रिस्ती धर्माचे शिक्षण देत. म्हणून अशा शाळेत लोक आपली मुले पाठवित नव्हते. परिणामी या शाळा ओस पडल्या होत्या. त्यामुळे लोकांना शिक्षण देण्याचे आपले प्रयत्न व्यर्थ जात आहेत असे सरकारला वाटत असे.

विद्यादानासारखे दुसरे पुण्य नाही, आणि हया पुण्याची नानांनी सार्थकता केली. लहानपणापासून नाना शंकरसेट यांच्या अंतःकरणात विद्येचे सर्वोत्कृष्ट बिज पेरले गेल्याने त्यांचा सुसंस्कार नानांच्या मनावर झाला. त्यामुळे आपल्या देशबांधवांची विद्येच्या अभावी

होत असलेल्या दैना त्यांना स्पष्ट दिसत होती. एकोनिसाव्या शतकाच्या आरंभी हयाबाबतीत आपल्या देशाची किती निकृष्टावस्था होती याची कल्पना करता येत नाही देशाची स्थिती सर्व बाजूंनी अगदी गुंतागुंतीची झाली होती. त्यातून देश व देशबांधवांची सुटका करण्यास शिक्षणाशिवाय दुसरे कोणते साधन नाही. याची खात्री नानांना पटली होती. त्यांच्या मनात हा अत्यंत पवित्र व महत्वाचा प्रश्न फार दिवस सारखा घोळत होत. सन 1818 मध्ये माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांची मुंबईचे गव्हर्नर (राज्यपाल) म्हणून नियुक्ती झाली. त्यांनी नानांच्या सत्त्याने, मार्गदर्शनाने व सहाय्याने मुंबईत आधुनिक शिक्षणाची पायाधरणी केली.[1] मुंबई इलाख्यात मुंबई शहर हे सर्वतोपरी प्रमुख ठिकाण असल्यामुळे प्रथमच या ठिकाणी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. नानांच्या समाजपयोगी कार्यापैकी सर्वात प्रथम त्यांचे शैक्षणिक कार्य होते.

नानांनी सार्वजनिक जीवनात पदार्पण केल्यानंतर तन–मन–धनाने सर्वप्रथम मनोभावे शिक्षण प्रसार कार्याकडे लक्ष पुरविले. प्राथमिक, दुय्यम व उच्च शिक्षण एवढेच नव्हे तर नाना प्रकारच्या भौतिकशास्त्रात, कलाकौशल्य, वैद्यकिय शास्त्रात, कायदेशास्त्रात आणि मानवी उन्नतीस कारणीभूत होणाऱ्या प्रत्येक शास्त्रात व विद्येत आपले देशबांधव तरबेज झाले पाहीजेत. त्यातच त्यांचा व देशाचा तरणोपाय आहे. हे नानांनी ओळखून ज्ञान प्रसाराच्या प्रत्येक कार्याशी आयुष्याच्या शेवटच्या क्षणांपर्यंत झटले, झिझले होते.

> नानांच्या शैक्षणिक कार्याबद्दल दादाभाई नवरोजी म्हणतात.
> ''ज्यांनी शिक्षणाचे बीज रुजत घातले; त्यांची निगा
> राखली, आणि आज दृष्टीस पडणारी त्याची निरामथ
> अथिवृध्दी होईपर्यंत त्याचा परिपोष केला, त्या
> आघाडीचया पहिल्या कार्याकर्त्यात जगन्नाथ शंकरसेट हे पहीले होते''.[2]

माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन सन 1818 च्या धामधुनीतून मोकळे झाल्यावर त्यांनी आपले लक्ष लोकसुधारणेकडे वळविले होते. त्यांनी जनतेच्या कल्याणार्थ अविश्रांत श्रम केले. आणि लोकसुधारणेचे मोठे कार्य केले. परंतु या कामात त्यांना नानांचे पूर्ण सहकार्य होते. रयतेस विद्यामृत पाजल्याशिवाय त्यांची सुधारणा होणे कठीण! त्यांस बरेवाईट कळू लागणार नाही. म्हणून प्रथम त्यांस विद्यादान दयावे, यासाठी त्याकाळी सर्व जनतेचे पुढारी असलेले आजचे लोकनायक नाना यास पहिल्याने सरकाने हाताशी धरले. त्यांना पूर्वी एल्फिन्स्टन साहेबांनी हयाच बाबतीत नानांचा सल्ला विचारला होता की, ''कोणत्या गोष्टी केल्यापासून रयतेस सुख होईल?'' तेव्हा नानांनी एल्फिन्स्टन साहेबांना स्पष्ट सांगितले की, ''रयतेय विद्यादान दिल्याशिवाय तिची ऐहिक व आत्मिक सुधारणा होणे नाही''.[3]

तेव्हा सरकारने नानांना हाताशी धरुन शिक्षणाचे बीज रोवले. त्याकाळात नानांनी पेरलेल्या बीजांचा मोठा प्रचंड वृक्ष होऊन तो आज उत्कृष्ठ व दळदार अशा फळभाराने अगदी लवून गेलेला आहे. मुंबईत जो आज शिक्षणाचा मोठा वृक्ष अस्तित्वात आहे. त्यामध्ये नानांचे परिश्रम कारणीभूत आहे. शिक्षण प्रसार हा नानांच्या आत्यंतिक जिव्हाळयाचा विषय होता.

1815 मध्ये मुंबईत अमेरिकी मिशनऱ्यांनी पहिली शाळा सुरु केली. ''बॉम्बे एज्युकेशन सोसायटी'' युरोपियन सैनिकांच्या 5 ते 9 वर्ष वयाच्या अनौरस व अनाथ मुलांना घेवून तिची सुरुवात झाली होती. त्याच बॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या विद्यमाने एल्फिन्स्टनने 1820 मध्ये ''दि नेटिव्ह स्कूल ॲन्ड स्कूल बुक कमिटी' स्थापन केली.[4]

या शाळेत लोक आपले मुले पाठविण्यास तयार होत नव्हते. तेव्हा शिक्षणप्रसारासाठी मुलांना पाठविण्याचे कमिटीतर्फे आवाहन आणि प्रयत्न केले. परंतु या प्रयत्नांना फारसे यश मिळाले नाही, कारण ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत जाणे म्हणजे धर्मातर नक्कीच अशी लोकांची समजूत होती. कारण या शाळेत ख्रिश्चन धर्माचा पगडा होता. तेव्हा नाना शंकरसेट यांनी नित्यनियमाने रोज घरोघरी फिरुन लोकांचा गैरसमज दूर करीत. नानांच्या या प्रयत्नामुळे शाळागृहे विद्यार्थ्यांनी भरु लागली कारण लोकांचा नानांवर जबरदस्त विश्वास होता. सरकार दरबारी नानांचे वजन होते. एवढेच करुन नाना थांबले नाहीत तर पाटी, पेन्सिल, वह्या, पुस्तके, गणवेश, अशाही गोष्टी नाना विद्यार्थ्यांना विनामूल्य देत असत.

मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टन यांचा नानांवर फार विश्वास होता. त्यांनी सरकारी शाळा कशा लोकप्रिय करता येईल याबाबतीत नानांचा सल्ला घेतला. यावेळी नानांनी आपल्या काही सहकार्यांशी विचारविनीमय करुन एक योजना आखली होती. आणि ती योजना नानांनी राज्यपाल एल्फिन्स्टन यांच्यापुढे सादर केली. तेव्हा या योजनेनुसार दिनांक 23.08.1822 मध्ये नेटिव्ह (हिंदी) लोकांना शिक्षण देण्यासाठी ''बॉम्बे नेटिव्ह स्कूल बूक ॲण्ड स्कूल सोसायटी'' नावाची संस्था स्थापन करण्यात आली याच संस्थेला ''मुंबईची हैंद शाळा किंवा शाळा पुस्तक मंडळी'' असेही म्हणण्यात येत असे.[5]

अशा रीतीने ही संस्था स्थापन करण्यात आली खरी, संस्थेला व संस्थाचालकास अनेक समस्यांचा सामना करावा लागला. साऱ्याच गोष्टीची मुळापासून सिध्दता करावी लागली. हया कार्यात शाळागृहे, पुस्तके, पंतोजी, व ज्यांना शिक्षण दयायचे तो विद्यार्थी समूह देखील नव्हता यावेळी नाना शंकरसेट यांनी व त्यांच्या सहकार्यांनी संपूर्ण सहाय्य करुन या अडचणी सोडविल्या. यामध्ये नानांचे सहकारी जगन्नाथ शास्त्री क्रमवंत, स.का.छत्रे (सदाशिवपंत छत्रे), जमसेटजी जिजीभाई, व्यंकटेश सदाशिव नाईक वगैरे पुढारी होते. अशा प्रकारे मुंबईत शिक्षण प्रसार करण्यासाठी प्रारंभी नाना व सहकाऱ्यांनी अतोनात मेहनत केली.

सोसायटीच्या मिळालेल्या देणग्यातून आणि सरकारी अनुदानातून कापाच्या मैदानावर एक शाळागृह बांधण्यात आले. शिवाय सोयीस्कर अशा भाडयाने जागा मिळविल्या होत्या.

मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टन यांच्या अध्यक्षतेखाली ता. 20 जानेवारी 1827 रोजी वार्षिक सभा घेण्यात आली. यावेळी संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करताना राज्यपालांनी हिंदी पुढाऱ्यांच्या सहकार्याबद्दल समाधान प्रकट केले. नानांच्या कार्याचा सर्वांनी गौरव केला. यानंतर याच सभेत ''बॉम्बे नेटिव्ह स्कूल बूक ॲण्ड स्कूल सोसायटी'' या संस्थेचे नाव '' बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'' असे सुटसुटीत देण्यात आले.[6] या संस्थेच्या ऐतद्देशीय हिंदी पदाधिकाऱ्यांमध्ये जगन्नाथ उर्फ नाना शंकरसेट, जमसेटजी जिजीभाई सदाशिव, काशिनाथ छत्रे इत्यादी कायम राहीले. 'या सर्व घडामोडीत नानांचा अत्यंत निकटचा संबंध होता.

एल्फिन्स्टन फंडाच्या मार्फत उच्च शिक्षणाकरिता एल्फिन्स्टन कॉलेजची स्थापना होताच. सन 1837 मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या त्या कॉलेज बरोबर मिलाफ करुन सोसायटीचे नाव 'एल्फिन्स्टन इंस्टिटयुट' असे बदलण्यात आले. पुढे तीन वर्षांनी बोर्ड ऑफ एज्युकेशनची स्थापना होऊन, नानांच्या परिश्रमाने स्थापन झालेल्या सोसायटीला उत्तम स्वरुप प्राप्त झाले होते. या बोर्डामध्ये जे तीन नेटिव्ह सभासद नेमण्यात आले त्यात नाना प्रमुख होते. सतत सोळावर्षापर्यंत म्हणजे त्या बोर्डाच्या अस्तित्वा– पर्यंत नानांची पुनः पुनः नेमणूक होत गेली.

सन 1827 मध्ये गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन च्या निरोप समारंभा निमित्त एल्फिन्स्टन फंडाची आणि एज्युकेशन इन्स्टिटयुटची स्थापना करण्यात आली. या संपुर्ण कार्यात नाना अग्रभागी होते. शिवाय एल्फिन्स्टन फंडाचे नाना अध्यक्ष होते. सभेच्या ठिकाणीच पासष्ट लोकांकडून पन्नास हजारांवर (52276 रु) जमविण्यात आले. फ्रामजी कावसजी, व जमसेटजी जिजीभाईनी प्रत्येकी सात–सात हजार रुपये दिले. जगन्नाथ शंकरसेट, महंमद अली रोगे व रुपजी धनजींनी प्रत्येकी तीन–तीन हजार रुपये दिले. अंतिमतः उच्च शिक्षणाच्या सोईसाठी 4.43901 रुपयांचा फंड जमविण्यात आला. या फंडाच्या व्यवस्थापनात नानांनी सातत्याने लक्ष घातले होते. नाना या संस्थेचे विश्वस्त झाले होते. नाना आयुष्याच्या शेवटपर्यंत ते संस्थेचे मुख्य आधारस्तंभ होते.

सरकारच्या शिक्षणविषयक नविन खलित्याप्रमाणे 1840–41 मध्ये ''बोर्ड ऑफ एज्युकेशन'' (शिक्षा मंडळी) ही शिक्षण प्रसारक, निमसरकारी संस्था अस्तित्वात आली. त्यामुळे बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन ही जवळपास विलय पावली होती.[7] सन 1865 पर्यंत म्हणजे आयुष्याच्या अखेरपर्यंत नाना एल्फिन्स्टन निधीचे कर्णधार, अध्यक्ष व विश्वस्त होते. इतकेच नव्हे तर एज्युकेशन कॉलेज व एल्फिन्स्टन शिक्षण संस्थाचे सुत्रधार होते. एल्फिन्स्टन निधी व कॉलेजसंबंधी नानांनी केलेल्या महत्वपूर्ण कार्याचा प्रो. दादाभाई नौरोजी यांनी गौरव केला. नानांनी मॉउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टनला केलेले सहकार्य जनतेला उपकार ठरले. शैक्षणिक कार्य हे नानाच्या जीवनाचे उच्चतम कार्य होते.

एल्फिन्स्टन विद्यालयात व दुसऱ्या शाळांत शिकलेल्या गृहस्थांनी मिळून 'स्टुडेंटस लिटररी एंड सायंटिफिक सोसायटी' या नावाची संस्था सन 6 जून 1848 ला स्थापन केली. या संस्थेचा उद्देश उपयुक्त ज्ञानाची वृध्दी करुन त्याचा प्रसार आपल्या लोकांत करावा असा होता. या संस्थेच्या सभासदांनी द्रव्य जमवून मराठी व गुजराती मूलींच्या शाळा स्थापन केल्या. या सभेच्या शाखा मराठी आणि गुजराती ज्ञानप्रसारक सभा आहेत 'ज्ञानप्रसारक' नावाचे पुस्तक काढले व त्यांनी छावून प्रसिध्द केले.[8]

स्टुडेंटस लिटररी एंड सायंटिफिक सोसायटीच्या कार्यकारी मंडळात अध्यक्ष प्रो. ए.एम. पॅटन, खजिनदार प्रो. दादाभाई नौरोजी, सेक्रेटरी प्रो. रीड वगैरे होते. बेहरामजी खर्शेदजी गांधी यांनी 4 ऑगस्ट 1849 रोजी त्यांच्या कॉलेजच्या तिसऱ्या वर्षात स्त्री–शिक्षणावर निबंध वाचला. या निबंधात स्त्रीयांच्या स्थीतीवर प्रकाश टाकण्यात आला. निबंधाच्या शेवटी बेहरामजी म्हणाले आता चर्चा खुप झाली, शब्द नकोत कृतीची आवश्यकता आहे. तेव्हा यावर प्रार्थना म्हणून आम्ही आमच्या घरातील मुलींना व बायकांना शिकवू आणि स्ततःच्या घरातून व कुटुंबात एका तरी विद्यार्थ्यीनीला तयार करु म्हणून विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.[9]

घरातील स्त्रीयांना व मुलींना शिक्षण नव्हते. आचार, विचार, आहार विहाराचे कोणतेही स्वातंन्त्र्य नव्हते. स्त्री–शिक्षणाबद्दल बोलणे वा लिहीणे निषेध्द होते. व सुधारक हा शब्दही हेटाळणीसमान वापरला जात असे. तरीही स्त्री उत्साहाने स्टुडेंट्स लिटररी व सायंटिफिक सोसायटीने स्त्री शिक्षणाचे कार्य करण्याचे ठरविले होते. ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. याच काळात पुणे येथे महात्मा ज्योतीबा फुले यांनी या क्रांतीचे बिज पेरले हे उल्लेखणीय आहे.

सप्टेंबर 1849 मध्ये प्रो. पॅटन यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. या सभेत मुंबई शहरात आठ विभागात कन्याशाळा उघडण्याचे ठरले जनजागृतीसाठी एक पत्रक काढण्यात आले. त्यात कन्याशाळांना जनतेने सहकार्य करावे अशी जाहिर विनंती करण्यात आली. या कन्याशाळांसाठी जागा विळविणे सर्वात महत्वाचे होते. तेव्हा स्टुडंटस लिटररी एंड सायंटिफिक सोसायटीच्या सदस्यांची अडचण नानांनी सोडविली होती. जगन्नाथ शंकरसेट यांनी या कार्यासाठी आपले आपल्या वाडयाजवळचे एक सुंदर छोटे कॉटेज ताबडतोब शाळागृह म्हणून दिले. कारण मुंबईत शिक्षणाची पायाभरणी नानांनीच केली होती. अशा तऱ्हेने 5 ऑक्टोंबर 1849 रोजी कन्याशाळाचे कार्य सुरु झाले.[10]

कॅप्टन रीड, दादाभाई नौरोजी, अर्देसर फ्रामजी या सर्वांनी सभा भरवून नाना शंकरसेट यांचे आभार मानले. ही त्या काळातील स्त्री–शिक्षणाची मुंबईतील पहिली संस्था होती. ही संस्था स्त्रियांच्या शिक्षणासाठी सतत झटत होती. या सर्व कार्यात नानांचे असामान्य योगदान होते. त्या संस्थेला मदत देऊन तिला प्रोत्साहन देणाऱ्या पहिल्या पुण्यवंतात नाना जगन्नाथ शंकरसेट हेच होते. एवढेच नव्हे तर त्यावेळी ज्या मूलींच्या शाळा स्थापन झाल्या त्यापैकी एक मूलींची शाळा नानाच चालवित होते. नानांनी या सोसायटीला तनमनधनाने सहाय्य केले.

बोर्ड ऑफ एज्युकेशन अस्तित्वात येऊन पाच वर्ष होत आलेली होती. परंतु शिक्षण प्रसाराचे कार्य खालच्या थरापर्यंत जाऊन पोहोचले नव्हते. शिक्षण प्रसार कार्यास पंचवीस वर्षापेक्षा अधिक काळ लोटला तरी जनतेतील समजूती. अत्याचारी प्रवृत्ती व व्यसनाधीनता ज्या प्रमाणात कमी व्हायला पाहीजे त्या प्रमाणात कमी झालेली नव्हती. दारुबाजी, जुगार, चोऱ्या, खून, मारामाऱ्या दंगेधोपे यासारखे अत्याचार खालच्या वर्गातील लोकांत जास्त प्रमाणात घडतात. त्यात काहीच घट झालेली नव्हती गाढ अज्ञान हेच सर्व प्रकारच्या अत्याचाऱ्याच्या बुडाशी आहे. याची नानांना खात्री पटली होती.

गुन्हयाच्या आरोपावरुन 1849 साली मुंबईतील न्यायालयापुढे जे 536 गुन्हेगार आले त्यात साधारण लिहीता वाचता येणारे फक्त 140 गुन्हेगार होते.[11]

तेव्हा शिक्षण प्रसाराचे लोण खालच्या थरापर्यंत पोहोचले पाहिजे, त्याशिवाय दुसरा मार्ग नाही, असे नानासारख्या जनतेच्या भवितव्याविषयी चिंता वाटणाऱ्या पुढाऱ्यास तिव्रतेने वाटत होते. मुंबई बाहेरील लोकांची तर शैक्षणिक स्थिती फारच मागासलेली होती.

सुधारणा व प्रगती यांच्या मार्गातील ही धोंड दूर करावयाची असल्यास सार्वत्रिक शिक्षण प्रसार हाच रामबाण उपाय आहे, असे जगन्नाथ शंकरसेट यांना मनापासून वाटत होते. शिक्षणाचा तळागळापर्यंत प्रसार व्हावा यासाठी नाना प्रयत्नशील होते. त्याबाबत सत्त्यस्थिती जाणण्यासाठी नानांनी 1846–47 मध्ये संपुर्ण महाराष्ट्रभर दौरा केला. अनेक लहानमोठया गावांना भेटी दिल्या. लोकांशी चर्चा केली. तेथिल परिस्थितीचे अवलोकन केले. नाना लोककल्याणासाठी लोकांत मिसळत असे.

नाना शंकरसेट यांनी गीरगांव विभागाची पाहणी केली. नाना घरोघरी गेले होते. याशिवाय मुंबईतील पाच विभागाचीही पाहणी करण्यात आली. नानांच्या नेतृत्वाखाली झालेली ही मुंबई शहरातील पहिली शैक्षणिक पाहणी होती.

त्याकाळी चौपाटीच्या जवळपासच्या भागात गोरगरीब विशेषतः कोळी लोकांची वस्ती मोठया प्रमाणात होती या भागातील मुलांना शिक्षणाचा लाभ व्हावा यासाठी नाना शंकरसेट यांनी त्या भागात आपल्या खर्चांनी शाळा उघडली व शाळेत येणाऱ्या मुलांच्या मार्गातील सर्व अडचणी नानांनी दूर केल्या. अशा प्रकारे नानांनी गरिबांना शिक्षणाचे दार खुले केले.[12]

अशा प्रवाहाविरुध्द विचार मांडण्याचे धाडस करणारे नाना हे प्रबोधनाच्या चळवळीचे आदर्श प्रवर्तक होते. अस्पृशांना शिक्षणाचा न्याय मिळवून देणे ही गोष्ट त्याकाळी साधीसुधी नव्हती. नाना शंकरसेट यांनी जात, पात, धर्म, पंत, स्त्री–पुरुष, स्पृश्य, अस्पृश्य असा कोणताही भेदभाव न करता समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी नाना सर्वोतोपरी झटले होते. नानांनी शिक्षणासाठी सर्व आयुष्य झोकून दिले व उदयाचे भविष्य घविण्याणाऱ्यांना सर्वच दृष्टया प्रेरणा दिली.

दोनशे व त्यापूर्वीच्या काळातील स्त्रीजन्माची व स्त्रीजीवनाची कहाणी खरोखरच कोणाच्याही हृदयाला पाझर फोडणारी अत्यंत करुणाजनक आहे. आज स्त्रीया प्रत्येक क्षेत्रात पुरुष वर्गाच्या बरोबरीने मानसन्माने वावरत आहेत. आणि वेळोवेळी आपल्या असामान्य अस्तित्वाची जाणीवही करुन देत आहेत. परंतु प्राचीन काळापासून स्त्रियांना घराच्या कोंडवाडयात कोंडून ठेवल्या जात असे. त्यांना शेळया–मेंढयाप्रमाणे जीवन घालवावे लागत होते. त्यांची अन्यायविरुध्द ब्र काढण्याची प्रज्ञा नव्हती. शास्त्रार्थाचा व रुढी साक्षरतेच्या दंडुका दाखवून त्यांना गप्प बसविण्यात येत होते.

आज आपण पाहतो की मुली हसत–खेळत शाळा, कॉलेजला जातात. पण त्याकाळी लोकांस असे वाटत असे की, आमच्या मुली वाचू लिहू लागल्या तर आपल्या नवऱ्यास सोडून परक्यांचा हात पकडून पळून जातील. एवढेच नव्हे तर मुलींना शिकविले तर त्यांच्या नवऱ्याचे आयुष्य कमी होते. त्यासाठी शास्त्री पंडिताकडून शास्त्राधारही पुढे करण्यात येत असत. त्याकाळात मुलींना विद्या शिकविण्याची शाळा मुंबईत एकही नव्हती. मुंबईत ब्रिटिश अधिकारी डॉ. विल्सन हे प्रगतीशील व सुधारणावादी होते. मुलींना शिक्षणापासून दूर ठेवले. हे त्यांना महापाप वाटत असे. त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली गिरगांव भागात एक कन्या शाळा उघडण्याचा निर्धार केला. परंतु त्याभागात मुलींच्या शाळेसाठी जागा देण्यास कोणीही तयार होत नव्हते. तेव्हा नाना शंकरसेट सुधारणावादी पुढारी होते. ही गोष्ट डॉ. विल्सनला माहित होते. तेव्हा डॉ. विल्सन यांनी या कामासाठी जगन्नाथ शंकरसेट यांची भेट घेतली व आपली अडचण त्याना सांगितली. तेव्हा कोणत्याही प्रकारे आढेवेढे न घेता नाना त्यांना म्हणले ''माझ्या वाडयाच्या शेजारी माझे एक लहानशे घर आहे. त्यात तुम्ही मुलींसाठी जरुर शाळा उघडा.''

नाना जागा देऊनच थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या घरातील मुली बाळीनाही या शाळेत दाखल केले. त्यांनी स्टुडंट्स लिटररी ॲंड सायंटिफीक सोसायटीला प्रोत्साहन देऊन हाताशी धरले, आणि आपल्या स्वतःच्या वाडयात 1848 साली मुलींची शाळा स्थापन केली हीच हिंदू मुलींची पहिली शाळा होय.[13]

अशा प्रकारे 1848 साली संस्थेच्या विद्यमाने नानांनी आपल्या स्वतःच्या घरात मुलींची शाळा काढली त्याकाळात मुलींची शाळा काढणे किती धाडसाचे आणि धोक्याचे होते. याची आज कल्पना करता येणार नाही. ही शाळा काढल्याबद्दल लोकांनी नानांना सळो की पळो करु सोडले. पण नानांनी त्यांना बिलकूल दाद दिली नाही. अशा प्रकारे मुंबईत स्त्रीशिक्षणाचे बी पेरण्यात नाना अग्रसर होते. या शाळेतून शेकडो मूली शिकून तयार झाल्या आहेत. सन 1848 हे वर्ष एक महान क्रांतीकारक वर्ष ठरले आहे.

नाना शंकरसेट, जोतीबा फुले यांनी ज्या काळात स्त्रीशिक्षणाचे कार्य उचलून धरले होते. ते पुढील येणाऱ्या पिढीला निश्चितच प्रेरणा देणारे ठरले. नाना स्त्री–शिक्षणासाठी स्वतः खर्च करीत. इतकेच नव्हे तर लोकांकडूनही देणग्या मिळवित. कोणा संस्थानिक जहागिरदार किंवा बाहेरगावचे श्रीमान सावकार मुंबईत आले म्हणजे शाळा पाहण्यासाठी त्यांना नाना बोलवित असे. व शाळांची प्रगती पाहून ते मोठमोठया देणग्या देत. शिवाय त्यांच्या गावी मुलींची शाळा उघडण्यासाठी नाना त्यांची मने वळवीत अशा प्रकारे स्त्रीशिक्षणाच्या विचारांना व कार्याला नानांनी अनन्यसाधारण बळ दिले. आणि मुंबई इलाख्यात स्त्री शिक्षणाची गंगा अवतरली याच गंगेचा एक भाग असलेली गिरगांवातली आद्य जगन्नाथ शंकरसेट मूलींची शाळा 160 वर्षापेक्षा जास्त काळ होऊनही अव्याहत पणे कार्य करीत आहे.

शिक्षणप्रसार हा नानांच्या आत्यंतिक जिव्हाळयाचा विषय होता. त्यासाठी आपल्याकडून जितका त्याग करता येण्यासारखा असेल तेवढा करण्यासाठी नाना सदासर्वकाळ झटत असत गिरगाव भागामध्ये गोरगरीब व मध्यमवर्गीय होतकरु विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेची गरज भासत होती. कारण एल्फिन्स्टन हॉयस्कूल व तेजपाल गोकुलदास हायस्कूल बरीच दूर होती. नानांनी गिरगाव विभागातील रहीवाशांसाठी एक इंग्रजी–मराठी शाळा काढण्याचा आपला हेतू शिक्षण खात्याच्या डायरेक्टरांस पत्र पाठवून कळविला. त्यासाठी म्हणजेच शाळागृह, शाळेसाठी जरुर असलेली सर्व साहीत्य, उपकरणे वगैरेसाठी जो खर्च येईल तो करण्याची माझी तयारी आहे. अशा प्रकारे नानांनी व मुंबईतील ब्रिटीश सरकारच्या साहाय्याने 1857 मध्ये 'जगन्नाथ शकरसेट स्कूल' स्थापन झाले. नानांनी सर्वोतोपरी जरुर ती मेहनत घेतली होती. हीच नानांची इंग्रजी–मराठी शाळा होय.

गिरगांव विभागात राहणाऱ्या अनेक होतकरु तरुणांचा जीवक्रम उज्ज्वल व यशस्वी करण्यात नानांच्या इंग्रजी–मराठी या शाळेने अत्यंत महत्वाचा भाग घेतला आहे. आधुनिक वैद्यकिय ज्ञानाची व शिक्षणाची दारे हिंदीवासीयांत खुली करण्याचे व मुंबई प्रांतात अव्वल दर्जाचे वैद्यकिय शिक्षण देणारे कॉलेज स्थापन करण्याचे श्रेय जगन्नाथ शंकरसेट, फ्रामजी कावसजी व जमसेटजी जीजीभाई यांना दयावे लागेल, आधुनिक वैद्यकशास्त्रामध्ये आपण फार मागे आहोत आपल्या येथील तरुणांनी पाश्चात्य वैद्यकिय पध्दतीचा सुध्दा अभ्यास करावयास हवा. त्यासाठी योजनाबध्द वैद्यकिय शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. असा विचार नानांच्या मनात चालू होता.

डॉ. जॉन मॅकलेनन त्याने सर्व प्रथम 1826 मध्ये मराठीतून वैद्यक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 'मेडिकल स्कूल फॉर व इन्स्ट्रक्शन ऑफ नेटिव्ह प्रॅक्टिशनर्स' नावाची संस्था स्थापन केली. त्या काळात करण्यात आलेला हा एक प्रयोग होता. तो अयशस्वी ठरवून 1830 मध्ये बंद करण्यात आला.[14]

मुंबईत शहरात तत्कालीन युरोपीयन डॉक्टरांत डॉ. मोरहेड यांचे स्थान सर्व बाबतीत श्रेष्ठ होते. ते लोकांत मिळून मिसळून वागत. नाना शंकरसेट यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. शिवाय शंकरसेट घराण्याचे ते कौटुंबिक डॉक्टर होते. तेव्हा नाना शंकरसेट, डॉ. मोरहेड

आणि राज्यपाल सर रॉबर्ट ग्रॅंट यांनी वैद्यकिय महाविद्यालयाची योजना तयार केली. मुंबईत पध्दतशीर वैद्यकशिक्षणाची सोय झाली पाहिजे असे नानांना वाटत होते. पण त्यासाठी सरकारच्या सहकार्याची गरज आहे. त्याशिवाय पाऊल पुढे टाकता येणार नाही याची कल्पना नानांना होती.

वैद्यकिय शिक्षणाची सोय करण्याचा प्रयत्न चालू असतानांच सर रॉबर्ट ग्रॅंट यांचे 9 जुलै 1838 मध्ये आकस्मिकरित्या निधन झाले. याच महिन्यात 28 तारखेला सर रॉबर्ट ग्रॅंट यांच्या निधनानिमित्त मुंबईतील नागरिकांची टॉउन हॉलमध्ये जाहीर सभा घेण्यात आली. ही सभा लॉर्ड बिशप यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. याच सभेत जगन्नाथ शकरसेट यांनी ग्रॅंट यांच्या स्मारकासंबंधीचा ठराव मांडला. स्मारकांसाठी निधी जमा करण्यासाठी वजनदार समिती नेमण्यात आली. त्यात नानांचा समावेश होता. जागच्या जागी 15975 रुपयांचे आकडे पडले. त्यात राज्यपाल जेम्स फॅरिस यांचा दोन हजारांचा व नाना शंकरसेट, जमसेटजी जिजीभाई, फ्रामजी कावसजी वगैरे पुढाऱ्यांनी प्रत्येकी एक एक हजार रुपयांचे आकडे टाकले होते.[15]

मेडिकल कॉलेजसाठी निधी जमविण्यात नानांनी पराकाष्ठेची मेहनत घेतली, कारण याच देही याच डोळा मेडिकल कॉलेज स्थापन झाले पाहिजे आणि त्यातील शिक्षण क्रम संपवून हिंदी डॉक्टर बाहेर पडले पाहिजेत, कमीत कमी खर्चात जनतेला औषधोपचाराची सोय कधी होते याकडेच नानांचे सतत लक्ष लागून राहीले होते. त्यांनी कंपनी सरकारशी पत्र व्यवहार करुन परवानगी व आर्थिक सहकार्य मिळविले. या कार्यासाठी पन्नास हजाराचा निधी जमविण्यात आला. सरकार कडूनही आरंभी तेवढी रक्कम मिळवून इ.स. 1845 मध्ये ग्रॅंट मेडिकल कॉलेजचे उद्‌घाटन करण्यात आले. अशा प्रकारे मुंबईत ग्रॅंट मेडिकल कॉलेजची स्थापना झाली. हेच मुंबईतील पहिले वैद्यकिय महाविद्यालय होय.

नाना शंकरसेट, फ्रामजी कावसजी, जेमसेटजी जिजीभाई यांच्यासारख्या उदारमतवादी व लोककल्याणकारी अहर्निश झटनाऱ्या पुढाऱ्यांनी सरकारचे सहकार्य मिळवून ग्रॅंट मेडिकल कॉलेज सारखी संस्था मुंबई शहरात सुरु केली होती.

आपल्या देशबांधवाच्या कल्याणार्थ सुरु होणाऱ्या प्रत्येक उपयुक्त उपक्रमास नाना हे तनमनधनाने कसे उचलून धरीत. प्रत्येक बाबतीत जातीने पुढाकार घेवून जनतेतील अज्ञान दूर करुन, जनता सुख समाधानाने राहावी यासाठी नाना कसे झटत असत ते यावरुन स्पष्ट दिसून येते.

मुंबईत 1855 सालापर्यंत पध्दतशीरपणे कायदयाचे शिक्षण संपादन करण्याची कोणतीच सोय नव्हती, मुंबई शहरात, जिल्हयात, तालुक्यात व गावातून कोर्ट कचेऱ्या होत्या. गरजू अशीलांची बाजू घेवून मुखत्याची करणारे 'कायदेबाज' लोकही होते. परंतु त्यांचे कायदयाचे ज्ञान तुटपुंजे होते. त्यामुळे योग्य पध्दतीने न्यायदान होत असेल असे सांगता येणे कठीण होते.

हेवेदावे, भांडणतंटे, आरोप—प्रत्यारोप, मारामाऱ्या, फसवणूक असे नाना प्रकारचे अत्याचार समाजात चालत होते. आरोपीला शिक्षा देण्याचे काम न्यायालय करत होते, परंतु आरोपीची बाजू मांडायला चांगले शिकलेले वकिल नव्हते. युरोपीयन अधिकारीच न्याय देत असत. न्यायदानाची प्रकिया ही पुर्णपणे इंग्रजांच्याच ताब्यात होती. भारतीय चालीरीती, परंपरा, पध्दती, यांचे पुरेसे ज्ञान त्यांना नसल्यामुळे न्यायदान बरोबर होत नसे. परीणामी गोरगरिबांची कुचंबना होत असे.

आपल्या देश बांधवांची प्रत्येक बाबतीत सुधारणा झाली पाहिजे, यासाठी नाना शंकरसेट झटून प्रयत्न करीत होते. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे शिक्षणाच्या या शाखेकडे लक्ष होते. शिक्षा मंडळाचे अध्यक्ष सर आर्स्किन पेरी हे नामांकित न्यायाधीश होते. त्यांनाही ही उणिव अत्यंत तीव्रतेने जानवत होती. त्यामुळे कायदयाचे पध्दतशीर शिक्षण देण्याची लवकर व्यवस्था झाली पाहिजे असे त्यांना तीव्रतेने वाटत असे. नाना शंकरसेट व सर आर्स्किन पेरी यांनी मुंबई प्रांतातील शिक्षण प्रसार कार्याला अधिकाधिक चालना दिली.

1830 मध्ये हिंदुस्थानात ईष्ट इंडिया कंपनीच्या 'कोर्ट ऑफ डायरेक्टर्स कडून शिक्षणाची पहिली सनद जारी झाली. त्यात कायदयाच्या शिक्षणाचा उल्लेख होता. 1835 मध्ये कायदे शिक्षणाच्या चळवळीला सुरुवात झाली. 1841 मध्ये सर आर्स्किन पेरी मुंबईच्या सुप्रिम कोर्टात न्यायाधीश झाले. 1847 मध्ये सर न्यायाधीश सर आर्स्किन पेरी यांनी एल्फिन्स्टन कॉलेजला जोडून कायदे शिक्षणाचा वर्ग सुरु करावा अशी सुचना केली.[16]

दहा वर्षाच्या यशस्वी कारकिर्दी नंतर सर आर्स्किन पेरी परदेशी जायला निघाले तेव्हा नानाच्या अध्यक्षतेखाली एल्फिन्स्टन इन्स्टिटयुट मध्ये नोव्हेंबर 1852 ला निरोप समारंभ संपन्न झाला.यावेळी नानांनी त्यांचे स्मारक करण्याचा ठराव मांडला. त्यासाठी निधी जमा करण्याचे कार्य उत्साहपुर्वक चालू आहे. आतापर्यंत चाळीस हजार रुपये जमा झाले आहे, आणखीही जामा होतीलच व त्यांच्या नावे एल्फिन्स्टन इन्स्टिटयुशनला जोडून कायदे शिक्षण वर्ग सुरु करण्यात यावा व त्याला 'पेरी' प्रोफेसरशीप ज्युरिस्प्रुडन्स' असे संबोधण्यात यावे, हा ठराव सर्वानुमते पास झाला. यावर हजर असलेल्या लोकांनी स्वाक्षऱ्या केल्या.[17]

स्मारक समितीचे अध्यक्ष या नात्याने स्मारकाची संपुर्ण जबाबदारी नानावर होती वर्षभरात निधीचा आकडा पन्नास हजार रुपयापर्यंत गेला.

जीवनात कायदेशास्त्राचे ज्ञान फार महत्वाचे आहे. ते शास्त्र आपल्या देश बांधवास अवगत झाले पाहिजे. तसेच जनतेला कमीतकमी खर्चात न्याय मिळवून देणारा देशी वकिल वर्ग निर्माण झाला पाहिजे, या सर्व गोष्टीची नानाच्या मनाला तळमळ लागून राहिली होती.

त्यांनी सरकारला 20 जुलै 1853 रोजी पत्र पाठवून, त्यात सर आर्स्किन पेरी यांच्या नावे कायदेशिक्षण शास्त्राचा वर्ग सुरु करण्याची विनंती केली. पण सरकारकडून फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. सरकारने दिरंगाईचे धोरण स्विकारले होते. नानाही स्वस्त बसले नाहीत.

शेवटी सुप्रिम कोर्टाने मत दिल्यानंतर, सरकारने स्मारक निधीत जरुर ती भर घालून पेरी प्राध्यापकाला दरमहा 300 रुपये पगाराची व्यवस्था करण्यात आली. पहीले पेरी प्राध्यापक म्हणून बॅ. आर. डी. रीड, एल. एल. डी. यांचे नाव जाहीर केले गेले.

3 जुलै 1855 ला शिक्षण क्षेत्राचे एक दालन उघडले. एल्फिन्स्टन कॉलेजच्या एका प्रशस्त सभागृहात कायदे शिक्षणाच्या प्रथम वर्गाचा प्रा. बॅ. आर. डी.रीड यांच्या भाषणाने प्रारंभ झाला. वर्गाला 100 विद्यार्थ्यांची हजेरी होती.18 हा मुंबईतीलच नव्हे तर अखिल भारतातील पहिला वहिला उपक्रम होता. अशा प्रकारे भारतातील कायदे शिक्षण देणारी ही पहिली संस्था होय.

25 ऑगस्ट 1852 पासून मुंबईतील स्थानिक पुढाऱ्यांनी विद्यापिठ स्थापन करण्याच्या चळवळीला प्रारंभ केला होता. कारण मुंबई प्रांतात शाळा कॉलेजची संख्या वाढू लागल्यावर विद्यापिठाची आवश्यकता भासू लागली होती. विद्यापिठाचा मुख्य हेतू असा की, परीक्षाच्या माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांची कला, विज्ञान, व साहित्य अशा शिक्षणाच्या निरनिराळया दालनातील प्रगती पाहून त्यांना पदव्या देणे, थोडक्यात

ज्ञान देण्यापेक्षा ज्ञानाची पातळी तपासणे हाच विद्यापिठाचा मुख्य हेतू म्हणता येईल.

वुडच्या खलित्या पाठोपाठ सरकारने सर जेम्स कॉलव्हिल यांच्या अध्यक्षतेखाली तीनही युनिव्हर्सिटीचा आराखडा तयार करण्यासाठी एका विषेश समितीची नेमणूक केली. डिसेंबर 12 तारखेला सरकारने 1857 कायदा दोन (2) म्हणून कलकत्ता युनिव्हर्सिटीचे विधेयक संमत केले. 1857 चा कायदा 22 हा बॉम्बे युनिव्हर्सिटीचा होता. तर त्याच वर्षीचा कायदा 27 हा मद्रास युनिव्हर्सिटीचा होता.

'मुंबई इलाखा आणि हिंदुस्थान यामधील राणी सरकारच्या सर्व वर्गातील आणि स्तरातील प्रजाननांना नियमित आणि मुक्त शिक्षणासाठी अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे यासाठी बॉम्बे युनिव्हर्सिटीची स्थापना करण्यात यावी. असे निश्चित करण्यात आले आहे. ज्या व्यक्ती वाडमय, विज्ञान आणि कला यातील विविध शाखांमध्ये प्रक्रिया मिळतील त्यांच्या क्षमतांची परीक्षाद्वारा खात्री करुन घेऊन त्यांना त्यांच्या त्यांच्या प्राविण्यानुसार विद्यालयीन पदव्या आणि त्यानुसार मानसन्मान देणे हे या युनिव्हर्सिटीचे उद्दिष्ट राहिल.[19]

अशा प्रकारे जगन्नाथ शंकरसेट, सर जमसेटजी जिजीभाई, डॉ. भाऊ दाजी, बामनजी हार्मसजी, महंमद युसुफ मुर्गे, डॉ. विल्सन इत्यांदीच्या प्रयत्नामुळे 18.07.1857 च्या कायदा क्र. 22 अन्वये मुंबई विद्यापिठाची, मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यांच्या कारकिर्दीत स्थापना झाली. हे विद्यापिठ लंडन विद्यापिठाच्या धर्तीवर होते. मुंबईचे गव्हर्नर हे विद्यापिठाचे चान्सलर म्हणून निवड झाली. तर या विद्यापिठाचे 26 सभासद निनेटर किंवा फेलोज होते.

नानांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याची योग्य दखल घेऊन ब्रिटीश राज्यकर्त्यांनी मुंबई विद्यापिठ स्थापन करताना नानांची 'दि फेलो ऑफ बॉम्बे युनिव्हर्सिटी' (मुंबई विद्यापिठाचे सिनेटर) अशी नियुक्ती केली.

अशा प्रकारे नाना शंकरसेट यांच्या प्रयत्नांना यश आले होते. नाना शकरसेट यांची बुध्दीमत्ता, त्यांचे समाजातील स्थान, त्यांची शैक्षणिक कामगिरी यांचा विचार करुन त्यांना विद्यापिठाचे प्रथमपासूनच 'फेला' ही पदवी देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. फेलो या नात्याने ते विद्यापिठाच्या कार्यात नियमित भाग घेत असे. जगन्नाथ शंकरसेट शिष्यवृत्तीमुळे तर त्यांचे नाव मुंबई विद्यापिठाशी कायमचे निगडीत झाले आहेत.

आज मुंबईत 'सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स' ही संपूर्ण भारतात नावाजलेली व चित्रकला शाखेलील विविध कलांचे पध्दतशीर शिक्षण देणारी संस्था नानावारुपास आलेली आपण पाहत आहो. या संस्थेच्या बिजारोपनात नाना शंकरसेट यांचे महत्वाचे योगदान आहे. ही संस्था दि. 2 मार्च 1857 रोजी 'सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट' एल्फिन्स्टन इन्स्टिटयुटमध्ये स्थापन झाली होती.

मराठी आणि संस्कृत भाषेचे संगोपन व अध्ययन या दृष्टीने त्या काळात नानांनी केलेले कार्य फार मोठे आहे. शिक्षण हा नव्या समाजरचनेचा पाया असतो. इंग्रजांची खरी ताकत त्यांच्या ज्ञानात आहे नानांनी ओळखले होते. म्हणून या आधूनिक शिक्षणाचा पाया मुंबईत जगन्नाथ शंकरसेट यांनी इंग्रजांना विश्वासात घेऊन रोवला. एल्फिन्स्टन हायस्कूल, कॉलेज, ग्रॅंट मेडिकल कॉलेज, लॉ कॉलेज, जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुलींची शाळा, मुंबई विद्यापीठ, या पायाभूत शिक्षणसंस्थाच्या उभारणीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. नाना जगन्नाथ शंकरसेट यांनी शैक्षणिक कार्यात तनमनधन खर्चून एक नविन पिढीत घडविली नाही तर सर्व आयुष्य झोकून देऊन उदयाचे भविष्य घडविणाऱ्यांना सर्वच दृष्टया प्रेरणा दिली. मुंबई इलाख्यातील शिक्षणाचा पाया नानांनीच घातला हे त्रिवार सत्य आहे. म्हणून नाना शंकरसेट हे त्याकाळातील महान शिक्षण सम्राट होते.

## *संदर्भ / तळटीपा*

1.वि.मा. पितळे, श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरसेट उर्फ नाना शंकरसेट हयांचे चरित्र, प्रकाशक, वि. या. पितळे, मुंबई, 1916, पृ. 74
2.पु.बा.कुलकर्णी, ना.नाना शंकरसेट यांचे चरित्र (काळ व कामगिरी), ना. नाना शंकरसेट चरित्र प्रकाशन समिती, मुंबई, 1959, पृ. 30
3.वि. मा. पितळे, पृ. 30
4.अमला नेवाळकर, समाजपुरुष जगन्नाथ शंकरसेट, महाराष्ट्र चरित्र ग्रंथमाला (संच) गंधर्व–वेद प्रकाशन पुणे, 2010.पृ. 51
5.डॉ. माधव रा. पोतदार. भरताचा पहिला राष्ट्रपुरुष, ना. जगन्नाथ शंकरसेट, अनुबंध प्रकाशन, पुणे, दु. आवृत्ती 2009, पृ. 51
6.पु.बा.कुलकर्णी, पृ.47
7अमल नेवाळकर, पृ. 57
8.गोविंद नारायण माडगांवकर, मुंबईचे वर्णन, साकेत प्रकाशन, 2011, पृ. 193,194
9.अमला नेवाळकर, पृ. 58
10.कित्ता, पृ. 59
11पु. बा. कुलकर्णी, पृ. 52
12. श्याम भुर्के, मॅनेजमेंट गुरु नामदार जनन्नाथ शंकरसेट, स्नेहल प्रकाशन पुणे, 2011 पृ. 33
13.अनंत आत्माराम चोडणकर युगपूरुष, ना. जगन्नाथ तथा नाना शंकरसेट, आपलं प्रकाशन, गोरेगांव, मुंबई, 2010, पृ. 65
14.पु. बा. कुलकर्णी, पृ. 83
15.कित्ता, 36
16.अमला नेवाळकर पृ. 75
17.पु.बा. कुलकर्णी, पृ.104, 105
18.डॉ. पी.पी. शिरोडकर, Hon, Jagannath Shanlarshet, prophet of Indias Resurgence and Maker of Modern Bombay, Vol .No. 1. पृ. 413, 414.
19.अरुण टिकेकर, ऐसा ज्ञानसागरु, बरवर मुंबई विद्यापीठाची, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 2007, पृ. 18.